**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : विनोद अमोलकचंद गुंदेचा**
वय : ६१ वर्षे, पेशा : व्यवसाय,
राहणार : चांदा, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.यादव :**

माझा उन्मेश फर्टीलायझर्स या नावाने खते, बी—बियाने, औषधे यांचा चांदा, ता.नेवासा, जि.अ.नगर येथे व्यवसाय आहे. मी महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ, अहमदनगर यांचेकडुन सदरचा माल खरेदी घेत असतो. मी माल खरेदी करणेबाबतचा करारनामा महाराष्ट्र कृषी महामंडळ, अहमदनगर यांचेशी केलेला आहे. मी महामंडळासोबत केलेल्या कराराची मुळ प्रत माझेजवळ नाही. मुळ प्रत ही महामंडळाकडे होती. मला आता दोषारोपपत्रासोबत दाखल फेरिस्त अ.क्र.३३/१ लगत दाखल करार दाखविला. त्यावर माझी व महामंडाळाची अधिकृत व्यक्तीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (आरोपी क्र.१ च्या वकीलांनी सदर दस्तास छायांकित प्रत असल्याने तसेच साक्षीदार क्र.२ यांचे पुराव्यात सदर दस्तास निशाणी दिलेले नसल्यामुळे आताही त्यास निशाणी देता येणार नाही अशी हरकत घेतली. सरकारी अभियोक्तांनी युक्तीवाद केला की, मुळ दस्त साक्षीदार क्र.२ ने पुराव्याच्या वेळी सोबत आणले होते व साक्षीदाराने अभिलेखावर दाखल दस्त मुळ वरून स्वत: प्रमाणित करून दिला असल्याचे सांगितले होते व महामंडळाचे अभिलेख असल्यामुळे मुळ दस्त त्यांचे कार्यालयीन कामाकरिता लागत असल्याने साक्षीदार ते अभिलेखावर दाखल करून शकत नसल्याने प्रमाणित करून तपासादरम्यान पोलीसांना दिली होती. सरकारी अभियोक्तांनी पुढे युक्तीवाद केला की, साक्षीदार क्र.२ ही त्या दस्तास साक्षीदार अगर पक्षकार नव्हती म्हणुन त्यास तिच्या पुराव्यात निशाणी देण्यात आलेली नव्हती. प्रस्तुत साक्षीदाराने दस्तांवरील सहया ओळखुन मजकुराबाबत सांगितले असल्याने व त्या दस्ताची पडताळणीची सत्यता साक्षीदार क्र.२ ने सांगितली असल्याने प्रस्तुत दस्त हा भारतीय पुरावा कायद्यातील तरतुदींप्रमाणे शाबीत

झालेला आहे.

दोन्ही बाजुंनी केलेला युक्तीवाद विचारात घेता साक्षीदार क्र.२ चे पुराव्याचे अवलोकन केले असता दिसून येते की, साक्षीदार क्र.२ ने तिच्या पुराव्याचे परिच्छेद क्र.१० मध्ये महामंडळाचा प्रस्तुत साक्षीदारासोबत करार झाला असल्याचे तसेच तो दस्त महामंडळातर्फे व्यवस्थापकांनी करून दिला असल्याचे सांगून त्याची मुळ प्रत सोबत आणली होती. साक्षीदार क्र.२ ने तिचे पुराव्यादरम्यान करार मुळ दस्ताप्रमाणे पडताळणी करून त्यावर तिने स्वत : दस्तऐवजधारक या नात्याने सत्यप्रत केला असा शेरा दिला असल्याचे सांगितले होते. साक्षीदार क्र.२ त्या दस्तास पक्षकार अगर साक्षीदार नसल्याने त्या दस्तास तिच्या पुराव्यात निशाणी देण्यात आलेली नव्हती. पण दस्ताबाबतचा इतर मजकुर साक्षीदार क्र.२ हिने आपल्या पुराव्यात सांगितल्याने व मुळप्रत सोबत आणलेली होती म्हणुन त्या प्रमाणित प्रतीस छायांकित प्रत म्हणता येणार नाही. साक्षीदार क्र.२ ने आपल्या पुराव्यात त्यास स्वत: मुळप्रमाणे तपासुन प्रमाणित केल्याचे सांगितल्याने व प्रस्तुत साक्षीदाराने त्या दस्तांवरील सहया ओळखुन मजकुराबाबत सांगितले असल्याने आरोपींनी घ ेतलेली हरकत ही रास्त नसल्याने ती नाकारण्यात येते. ) सबब, सदर दस्तास **नि.क्र.१०५** देण्यात येते.

२. मी आवश्यक मालाची ऑर्डर ही फोनव्दारे अगर महामंडळाचे नेमूण दिलेली व्यक्ती प्रत्यक्ष आल्यानंतर देत होतो. कधी कधी मी ऑफिसला जावुन ऑर्डर देत होतो. महामंडळातर्फे आमच्याकडे येणारे व्यक्ती होले किंवा राजुरकर होते. सदर ऑर्डरचे पेमेंट हे महामंडळाच्या नावे धनादेश अगर डी.डी. ने केले जात होते. मी महामंडळासोबत अंदाजे ३० वर्षांपासुन काम करत आहे व मागील १५ वर्षांपासुन माझा कुलट यांचेशी महामंडळाशी असलेल्या कामासंदर्भात संपर्क आला होता. कुलट हे महामंडळामध्ये अहमदनगर शाखेचे लिपीक म्हणुन कार्यरत होते. कुलट यांचे मुलाचे गणेश ऐजन्सी या नावाने महामंडळाच्या ऑफिसच्या जवळ कार्यालय होते.

३. सन २०१३ साली माझे मुलीचे लग्न झाले त्यावेळी मला त्या लग्नकार्यामुळे आर्थीक अडचण होती. मी महामंडळाकडुन घेतलेल्या ऑर्डरचे त्या काळातील केलेले धनादेशाव्दारे पेमेंटपैकी काही पेमेंटचे धनादेश अनादरीत झाले होते. माझा अनादरीत झालेला धनादेश कुलट त्यांचेकडे ठेवायचे व मी त्यांना जसे जमेल तसे रोखीने रक्कम दिल्यानंतर ते मला पैसे अदा केल्याचे कळवायचे. मी रोखीने जे पैसे द्यायचो ते मी घेतलेल्या मालापोटीचे आहेत. माझी कुलट यांचेसोबत ब—याच कालावधीकरिता व्यवहार झाल्याने चांगली ओळख झाली होती म्हणुन कुलट मला अनादरीत झालेल्या धनादेशाचे पैसे रोखीने देण्याकरिता वेळेत देत होते. मी रोखीने दिलेल्या पैशांच्या पावत्या मला कुलट यांनी दिलेल्या नव्हत्या. मी रोखीने दिलेल्या पैशांची नोंद माझे दैनंदिन कामकाजाच्या रजिस्टरमध्ये केलेली असून त्यामध्ये हस्ते म्हणुन कुलट यांचे नावाचा उल्लेख केलेला आहे. मी सन २०१२ ते २०१७ पर्यंतच्या कालावधीमध्ये कुलट यांना घेतलेल्या मालाच्यापोटी अंदाजे १०—१२ लाख रूपये रोखीने दिले होते. मी माझे रजिस्टरची प्रत पोलीसांना तपासादरम्यान दिली होती. मुळ रजिस्टर माझे ताब्यात आहे. मी आजरोजी ते रजिस्टर आणलेले नाही. मी ते पुढील तारखेला घेवुन येवु शकतो.

सरकारी अभियोक्तांच्या तोंडी विनंतीवरून पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०६, अहमदनगर

**दि.०१/०७/२०२४.**

**शपथेवर पुढील सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.यादव :**

४. मी आजरोजी सन २०१२ ते सन २०१७ पर्यंत माझे कार्यालयातील रोजमेळ रजिस्टर आणलेले आहे. सदरचे रजिस्टर माझे कार्यालयात काम करणारे भाउसाहेब मच्छिंद्र जाधव लिहितात. ते मागील ३० ते ३५ वर्षांपासुन माझेकडे कार्यरत आहेत. भाउसाहेब जाधव हे मी त्यांना सांगितलेल्या व्यवहाराप्रमाणे रजिस्टरमध्ये नोंद घेतात. सन २०१२ मध्ये मी दि. १८/०५/२०१२ रोजी रोख रक्कम रू.३०,०००/— आरोपी रामचंद्र कुलट यांना महाराष्ट्र कृषी महामंडळ यांचेकडुन घेतलेल्या मालापोटी दिलेले आहेत. सदर नोंदीतील हस्ताक्षर हे भाउसाहेब जाधव यांचे आहे. भाउसाहेब जाधव माझेकडे काम करत असल्यामुळे मी त्यांचे हस्ताक्षर ओळखतो. सदर रक्कम दिल्याबाबत कोणतीही पावती करण्यात आली नव्हती.

सरकारी अभियोक्तांच्या तोंडी विनंतीवरून पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०६, अहमदनगर

**दि.१२/०७/२०२४.**

**शपथेवर पुढील सरतपास अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.यादव :**

५. मी आजरोजी सन २०१२ ते सन २०१७ पर्यंत माझे कार्यालयात नोंद घेतलेल्या खातावणी आणलेल्या आहेत. खतावणीमध्ये झालेल्या व्यवहाराचे पैसे कसे आले व गेले याचा उल्लेख आहे. माझेकडे आलेला माल व त्याचे अदा केलेले बिल याची वेगळी नोंद आहे. माझे खतावणीमध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेसोबत झालेल्या व्यवहाराची व अदा केलेल्या बिलांची नोंद आहे. मी माझे मुळ खतावणी सोबत आणलेल्या आहेत व त्यातील महाराष्ट्र कृषी उद्योग विकास

महामंडळ यांच्या सोबत झालेल्या व्यवहाराच्या खतावणीच्या नोंदी पडताळणी करून अभिलेखावर निशाणी १०७/१ ते १०७/५ सोबत दाखल केलेल्या आहेत. खतावणीतील नोंदी माझे आदेशाप्रमाणे माझे कार्यालयीन कर्मचारी भाउसाहेब मच्छिंद्र जाधव यांनी घेतलेल्या आहेत. त्या सर्व नोंदी झालेल्या व्यवहाराप्रमाणे बरोबर आहेत. मी दाखल केलेल्या नोंदी तसेच मुळ खतावणीमधील खरेदी घेतलेला माल तारखेसह, त्या मालाची अदा केलेली रोखीने अगर धनादेशाने अदा केलेली रक्कम तारखेनिशी घेतलेली आहे. रोखीन जी रक्कम अदा केलेली आहे ती कोणाला व कशाप्रकारे दिली त्याचा उल्लेख आहे. सन २०१२ ते सन २०१६ पर्यंतचे खतावणीतील नोंदीच्या पानाच्या प्रती मुळवरून पडताळणी केलेल्या आहेत व मला मान्य आहेत. (सदर दस्तास निशाणी देण्यास आरोपीच्या वकीलांनी हरकत घेतली व युक्तीवाद केला की, सदर दस्तातील कोणतीही नोंद प्रस्तुत साक्षीदाराने घ ेतलेली नाही. तसेच त्या खतावणी वहीवर त्यातील मजकुर मान्य असल्याबाबत सही केलेली नाही. सरकारी अभियोक्तांनी युक्तीवाद केला की, साक्षीदाराने दस्तातील नोंदी त्याचेसमक्ष त्याने सांगितल्याप्रमाणे घेतलेल्या आहेत याबाबत आपल्या पुराव्यात कथन केले असुन त्या नोंदी कोणी घ ेतलेल्या आहेत याबाबतही पुरावा दिलेला आहे व मुळ दस्तही सोबत आणलेले आहेत. त्यामुळे भारतीय पुरावा कायद्यानुसार दस्तास निशाणी देण्याकरिता आवश्यक त्या सर्व बाबी साक्षीदाराने आपल्या पुराव्यात मान्य केलेल्या आहेत. त्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावी.) दोन्ही बाजुंनी केलेला युक्तीवाद विचारात घेता तसेच दोषारोपपत्रासोबत सदर साक्षीदाराकडुन तपासादरम्यान घेतलेले काही दस्तऐवज व आजरोजी निशाणी १०७/१ ते १०७/५ सोबत दाखल अधिकचे दस्तऐवज विचारात घेता त्या अधिकच्या दस्तऐवजांच्या नोंदीची अस्तित्व व पुराव्यातील परिपक्वता कशी शाबीत होते हे अंतिम युक्तीवादाच्या वेळी सर्व पुरावा दाखल झाल्यानंतर ठरविणे योग्य होईल व सद्य स्थितीत त्या दस्तांना ओळख म्हणुन **नि.क्र.१०८/१ ते नि.क्र.१०८/५** देण्यात येतात. मला महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांच्या सोबत झालेल्या व्यवहाराच्या कोणत्याही पावत्या मिळालेल्या नाहीत

त्यामुळे मी त्या दाखल केलेल्या नाहीत.

६. मला आता दि.०८/०७/२०१५, दि.२६/११/२०१४, दि. ३१/०७/२०१४, दि.२५/१२/२०१४, दि.१३/१२/२०१६, दि. ३१/०७/२०१५, दि.२९/०३/२०१७, दि.२७/०५/२०१७, दि. २५/०८/२०१७, दि.३०/०४/२०१५, दि.२७/०२/२०१५, दि. रोजीचे स्थळप्रती १३ पावत्या दाखविल्या. त्या पावत्या उन्मेश फर्टीलायझररर्सच्या नावे आहेत. सदर स्थळप्रतींच्या मुळ प्रती मला मिळालेल्या नाहीत त्यामुळे मी त्या दाखल करू शकत नाही. मला महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने त्यांना माझेकडुन अदा झालेल्या पैशांबाबतचा उतारा दिलेला आहे. तो माझेजवळ आहे पण तो मी आजरोजी आणलेला नाही. तो मी पुढील तारखेस घेवुन येवु शकतो.

सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

( माया अ. देशमुख )
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०६, अहमदनगर

**दि.०१/०८/२०२४.**

**<u>शपथेवर पुढील सरतपास अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.यादव</u> :**

७. मला उन्मेश फर्टीलायझररर्सचा फिर्यादी महामंडळासोबत झालेल्या व्यवहारांचा खातेउतारा फिर्यादी महामंडळाकडुन वेळोवेळी मिळालेला आहे. तो उतारा मला महामंडळाचे संबंधित अधिका—यांनी त्याचे सही व शिक्यानिशी दिलेला आहे व त्याची प्रत मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्या खातेउता—यांमध्ये मी धनादेशाव्दारे व डी.डी.व्दारे अदा केलेल्या पैशांचा उल्लेख आहे. जेव्हा माझा धनादेश अनादरीत झाला होता तेव्हा मी त्या

धनादेशापोटी टप्प्याटप्प्यामध्ये रक्कम दिलेली असतानाही खातेउता—यांमध्ये त्या टप्प्याटप्प्याप्रमाणे पैसे जमा झाल्याची नोंद नसून एकरकमी नोंद घेण्यात आल्याचे मला आढळले. मी कधी कधी आर.टी.जी.एस.व्दारे देखील रक्कम अदा केली होती त्याचाही उल्लेख खातेउता—यामध्ये आहे. मी आज दाखल केलेले खातेउतारे मला मान्य आहेत. माझे महामंडळासोबत झालेल्या व्यवहारांपैकी काही व्यवहारांचे पैसे मी कुलट यांना रोखीने दिले होते व त्यांनी ते डी.डी.व्दारे भरल्याची नोंद माझे खातेउता—यात दिसते.

सरतपास पुर्ण.

**आरोपींतर्फे उलटतपास घेणेकामी पुढील मुदतीचा अर्ज आल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH DN: cn=MAYA ABHIJEET DESHMUKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6953363, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN Date: 2024.09.06 17:17:34 +0530

( माया अ. देशमुख )

**दि.०६/०९/२०२४.**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०६, अहमदनगर